संचालनालय लेखा व कोषागारे,
वित्त विभाग, मुंबई
दिनांक:- १८/०७/२०१४

**आहरण व संवितरण अधिकारी यांना माहे जुलै, २०१४ चे वेतन देयके तयार करण्याकरीता महत्वाची सूचना**

माहे जून, २०१४ पासून सेवार्थ प्रणाली तांत्रिक बिघाड झाल्यामुळे संथ गतीने सुरु आहे. यामुळे आहरण व संवितरण अधिकारी व संबंधित कार्यालयांना देयके तयार करण्यास अडचणी निर्माण झाल्या आणि त्यांचा कालापव्ययही झालेला आहे. यामुळे माहे जून, २०१४ मध्ये बऱ्याच कार्यालयांचे वेतन संवितरणही विलंबाने झालेले आहे.

या अडचणींचे निराकरण करणेबाबत संचालनालयाकडून तांत्रिक सल्लागारांच्या मदतीने सर्वोतोपरी प्रयत्न सुरु आहेत. सद्यस्थितीत सेवार्थ प्रणालीव्दारे माहे जुलै, २०१४ मध्ये वेतनवाढ प्रमाणपत्र निर्गमित करण्याबाबतची सुविधाही सर्व कार्यालयांकडून एकाच वेळी वापरली जात असल्यामुळे प्रणालीवरील भार वाढला आहे. याशिवाय इतर तांत्रिक कारणामुळेही प्रणाली संथ गतीने सुरु आहे. यामुळे इतर तांत्रिक उपाय योजनांशिवाय इतरही प्रशासकीय उपाय योजना करुन प्रणालीची गती वाढवीता यावी म्हणून वेतनवाढ प्रमाणपत्र तयार करण्यासाठी विभागनिहाय आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना खालील तपशिलाप्रमाणे वेळापत्रक नेमून देण्यात येत आहे. या वेळापत्रकाप्रमाणे त्या त्या विभागातील आहरण व संवितरण अधिकारी यांना वेतनवाढ प्रमाणपत्रे काढण्याकरीता प्रणालीवरील सुविधा उपलब्ध राहील. **इतर वेळी सदर सुविधा बंद राहील.** त्याप्रमाणे त्यांनी वेतनवाढ प्रमाणपत्रे तयार करण्याची आणि वेतन देयके तयार करण्याची कार्यवाही करावी. यामुळे प्रणालीची गती वाढून सर्वच आहरण व संवितरण अधिकारी यांच्या अडचणी कमी होऊन कार्यसुलभता वाढू शकेल.

त्यामुळे सर्व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना सूचित करण्यात येते की, खालील तपशिलाप्रमाणे त्यांना उपलब्ध होणाऱ्या वेळेत प्रणालीवर वेतनवाढ देऊन वेतन देयके तयार करावीत.

| अ.क्र | विभागाचे नाव | दिनांक |
|---|---|---|
| १) | अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई/ नाशिक विभाग/ पुणे विभाग/ कार्यक्षेत्रातील सर्व आहरण व संवितरण अधिकारी | २१,२२, २३ जुलै, २०१४ |
| २) | कोकण/ औरंगाबाद/ नागपूर/ अमरावती विभाग/ कार्यक्षेत्रातील सर्व आहरण व संवितरण अधिकारी | २४,२५,२६,२७ जुलै, २०१४ |

उपरोक्त सूचनांची नोंद सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांनी घ्यावी व या कालावधीतच वेतन देयके तयार करावीत. कोषागार अधिकारी/ उपकोषागार अधिकारी यांनी सदरच्या सूचना सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांच्या निदर्शनास आणाव्यात तसेच त्या सूचना फलकाव्दारे प्रसिध्द कराव्यात.

संचालक,
लेखा व कोषागारे,
महाराष्ट्र राज्य, मुंबई